विषवल्ली ... भाग २

एकदा एका मंगळवारी मनीष लीना दुपारी जेवायला भेटले. दोघेही कचेरीतून मधेच निघून एकत्र भेटले होते. लीनाला आठवले त्यांचे कॉलेजचे कोवळे दिवस. कॉलेजमध्ये असताना कॉलेज बुडवून ते असेच फिरत असत. खिशात ना फुटकी दमडी. मग चालणे आणि फक्त चालणे. आई लीनाला महिना दहा रुपये पॉकेटमनी देई व मनीषने मागितले की ते त्याला ती देऊन टाकी. त्याच्याकडे कुठून येणार पैसे म्हणून. मग हिचा खिसा रिकामा. ती दुपार लीनाची खूप छान गेली. तिच्या मनीषबरोबर. ते एकत्र जेवले. एकत्र फिरले. काम आटोपल्यावर ती घरी आली व तो आपल्या कचेरीत परत गेला. पण ते तेव्हढेच. रात्री जेव्हा मनीष घरी परतला तेव्हा तो नेहेमीसारखाच पिऊन आला होता. मग तिने त्याला विचारले.

"दुपारी आपण भेटलो तेव्हा तुला नाही का छान वाटलं ? मला तर आपले कॉलेजचे दिवस आठवले. पण मग आता तू कशाला पुन्हा पिऊन आलायस ?"

इत्यादी इत्यादी. अगदी प्यायलेल्या नवऱ्याला एखादी वैतागलेली बायको जे जाब विचारेल ते सर्व तिने विचारले. त्यावर मनीष तिला एकच म्हणाला.

"तू फक्त ती दुपार लक्षात ठेव ना मग ? रात्र कशाला धरून बसतेस ?"

नवऱ्याबरोबरची रात्र लीनाची नसे. रात्र वैऱ्याची असे.

कोवळ्या वयात असल्यापासून मनीषवर जीवतोड प्रेम करणारी लीना आता आयुष्याच्या दुसऱ्या पायरीवर एकटी उभी होती. त्या पायरीसमोर पूर्ण अंधार. त्यामुळे पुढे काय वाढून ठेवले आहे ह्याबद्दल ती स्वत: पूर्णत: अनभिज्ञ. दुसरा पुरुष आयुष्यात येणे हे काही सरळ मनाच्या लीनाला फारसे आनंददायी नव्हते. परंतु, ते घडले. वा ती ते टाळू नाही शकली. जे घडायचे ते नेहेमीच घडते. जर टाळले गेले असते तर त्याचाच अर्थ ते घडणारच नव्हते असा नव्हे काय ? आणि मग त्यात एक प्रामाणिकतेचा तिला लागलेला शाप. वा वरदान ?

हे आपण जे मनीषला फसवत आहोत ते काही बरोबर नाही. त्यात त्याची किती चूक आहे हे आपण जाणतो तसेच तोही जाणत असेल. आपण त्याच्यावर किती प्रेम केले. व त्याने आपल्या सर्वच गरजांकडे पूर्ण दुर्लक्ष केले...हे असे नाना विचार तिच्या मनी येऊ लागले. आता जर हा सर्व प्रकार थांबवायचा असेल तर सर्वात प्रथम घडलेली घटना आधी मनीषच्या कानावर घालणे भाग आहे. त्यातच आपले दोघांचे, नव्हे तिघांचे भले आहे असे लीनाला वाटू लागले. तरच आपण आपला संसार पुन्हा कोऱ्या पाटीवर रेखू शकू, ही तिची भावना. तेच ते तिचं गणित...एक अधिक एक दोन.

दारू पिऊन घरी उशिरा परतणे हे तर मनीषचे रोजचेच झाले होते. कॉलेजमध्ये बऱ्याचदा मनीष म्हणाला तर होता...लग्न झालं की मी सोडणारच आहे...पण आता तर हे नेहेमीचंच झालं...आपण

न्यायालयात गुन्हेगाराच्या चौकटीत उभे रहायला निघालो आहोत खरे....पण ज्याच्याकडून न्यायाची अपेक्षा आहे तो ह्या खटल्यात मुख्य गुन्हेगार आहे त्याचे काय ?

आता हे सर्व मनीषला सांगायचे तरी कधी व कसे हा लीना पुढील यक्षप्रश्न.

लीनाने रात्रंदिवस विचार केला. न सांगणे तिला जगू देईना. आणि कसे सांगावे हे कळेना. रोज पाच वाजत होते. पहाट होत होती. लीना यंत्रागत दिवस सुरु करत होती. दिवस पुढे सरके...पण तिचे विचार मात्र जसं शिवणयंत्र अचानक अडकून पडावं...किती पाय मारावेत...किती चाक हाताने ढकलावं...ना सुई पुढे सरके...ना टाका मारला जाई...सुई फक्त वरखाली होत होती आणि कापडावर एकाच जागी नुसत्याच गाठी पडत होत्या...नुसती गुंतागुंत. काय होईल नाही सांगितले तर ? आपण हा चुकीचा रस्ता तर बदलू...जिथे आहोत तिथूनच परत फिरू....पण कधीतरी एक वळण चुकीचे घेतले होते त्याचे हे जड ओझे आता कुठे टाकू ? प्राजक्ताला तयार करे...शाळेत त्या दोघी नेहेमीच चालत जात. आणि त्यावेळच्या त्यांच्या गप्पा तर किती रंगत. पण आता गेले काही दिवस फक्त लीना हुंकार भरत होती...आणि हे असे फक्त हुंकार भरणे देखील तिला त्रास देत होते...लीनाला मोकळा श्वास हवासा होता...पुन्हा एक मोकळा श्वास...तोच एक श्वास तिला तिच्या जोडीदाराकडे मागायचा होता.

ती आधी शेखरला भेटली. मुंबईतील एका गजबजलेल्या हॉटेलमध्ये. चारच्या सुमारास. चहा पीतपीत त्याला तिने सर्व सांगितले. हे सर्व कसे घडले. ती कशी त्यात वहावत गेली हे व असेच बरेचसे. मनीषला हे सर्व सांगण्यात धोका आहे हे शेखरने तिला सर्वप्रथम बजावले. परंतु, हा असा खोट्या पायरीवर पुढील संसार नाही उभा करता येणार हे तिने त्याला सांगितले.
"ठीक आहे. मग सांग." शेखर तिला म्हणाला.

सकाळी चालायला जाणे हा मनीषचा रिवाज. त्यादिवशी तो जेव्हा फेरफटका मारायला गेला त्यावेळी लीना घरात बसून सगळे बळ एकवटत होती. धावपळ करून प्राजक्ताला शाळेत सोडण्याचे रोजचेच तिचे काम आजही तिने सवयीने केले होते. त्या कामात मनीषने काही हातभार लावावा असे तिला सुरुवातीला फार वाटे. जगभरातील अनेक स्त्रियांप्रमाणे तिलाही त्यातील फोलपणा जाणवला. मग एकदा मनाची समजूत घातल्यावर सगळी कामे एकटीनेच करणे तसे तिला सोपे गेले.

आज मनीषची वाट बघत ती दिवाणखान्यात वर्तमानपत्र वाचण्याचे सोंग करत होती. सांगायचे हे एकदा ठरवल्यावर त्यावर तिने तसा काहीही विचार केला नव्हता. म्हणजे प्लान ए नीट नाही झाला तर प्लान बी काय असेल हे तिच्या डोक्यात काहीही तयार नव्हते. तो काय म्हणेल काय करेल काही अंदाज बांधता येत नव्हता. घरात कोणी मोठं नव्हतं ज्यांच्यासमोर हातून घडलेली अक्षम्य चूक मान्य करून माफी मागता येईल. वा पुढे काय करावे ह्याचा सल्ला घेता येईल. तिच्या आईशी इतकी

जवळीक तिची कधीच नव्हती. खरं तर एखाद्या रात्री मनीषला सांगणे हे सोप्पे गेले असते. नवरा बायको ह्यांचे खाजगीतील संवाद खरे तर बिछान्यात होणे हे अधिक उचित असते काय ? ती नाना विचार करीत होती. परंतु, मनिषशी संवाद असा कधी केलेला तिला आठवेचना. इकडचे तिकडचे बोलणे होई. परंतु, कधी कुठल्या गंभीर विषयावर बोललेले नव्हते आठवत. म्हणजे मग आपण गेली इतकी वर्षे करत काय होतो ? असा विचार येऊन तिने फटकन वर्तमानपत्र समोरील टेबलावर आपटले आणि तेव्हढ्यात दारावरची घंटा वाजली.

मनीष परत आला होता. घामेजलेला. बूट काढीत कोचावर बसला. शिरस्त्याप्रमाणे लीनाने त्याच्या हाती पाण्याचा ग्लास दिला. त्याने ताजे वर्तमानपत्र हाती धरले व नेहेमीप्रमाणे तो बाथरुमच्या दिशेने जाऊ लागला.
"मला तुझ्याशी काही बोलायचंय."
"बोल ?"
"बस ना तू. इथे. माझ्याजवळ."
धीर एकवटून. बळ गोळा करून. वगैरे वगैरे. शेवटी लीनाने मनीषला सर्व सांगितले. कुठल्या सुंदर स्वप्नात ती होती कोण जाणे. ह्या सर्व प्रसंगातून तिने काय आशा धरली होती हे देवच जाणे. पण त्यानंतर मनीष सकाळी जो कचेरीत गेला तो रात्री घरी फिरकलाच नाही. रात्री उशिरा प्राजक्ताला घेऊन लीना त्याच्या ऑफिसला पोचली. खूप काम आहे ते आटोपले की येईन असे त्याने तिला सांगितले व घरी परत पाठवून दिले. दोन दिवस उलटले. मनीष घरी आला नाही. चवथ्या दिवशी मनीषचा निरोप घेऊन ज्यावेळी शेखर लीनाकडे पोचला त्यावेळी लीना अंथरुणाला खिळली होती. तीन दिवस पोटात अन्नपाण्याचा थेंब नव्हता गेला.
"त्याने तुला घरातून निघून जायला सांगितलेले आहे. प्राजक्ताला घेऊन."
"पण का ? मला त्याच्याशी बोलायचंय."
"ते आता कधी होईल नाही माहित. तू तुझ्या आईवडिलांकडे निघून जा. त्याशिवाय मनीष घरी नाही परतणार. गेले तीन दिवस तो आमच्याकडेच आहे."

मनीष किती हट्टी आहे हे तिला वेगळे कोणी सांगायची गरज नव्हती. हा निर्वाणीचा निरोप ऐकल्यावर लीनाच्या हाती काय उरलं होतं ? ती तिच्या माहेरी गेली. त्यावेळी प्राजक्ता पाच वर्षांची होती. आजी आजोबांकडे रहायला जायचे म्हणून ती खुष होती. रस्त्यात उड्या मारीत असलेल्या प्राजक्ताचा थकलेल्या लीनाला उगाच राग येत होता. आता पुढे नशिबी काय वाढून ठेवले होते कोण जाणे. ह्या सर्वात प्राजक्ताचा विचार कोणी केला होता का ? कुठलेतरी बंड डोक्यात घेऊन चुकीचे पाऊल टाकताना लीनाने वा ह्या लीनाच्या चुकीत आपला सहभाग किती ह्याचा तिळमात्र विचार न करता तिला घराबाहेर काढणाऱ्या मनीषने. कोणी त्या चिमुरडीचा विचार केला का ?

हे सर्व घडून जवळजवळ महिना दोन महिने उलटले. लीना माहेरी रहात होती. लेकीबरोबर. आता ती तिथे किती दिवस राहील कोण जाणे. ह्या विचाराने लीनाच्या आईने तिला तिच्या कपाटात एक खण रिकामा करून दिला. धुसफुसत. त्यात लीनाने स्वत:चे व लेकीचे कपडे पुरवून बसवले. वाहते डोळे व वाहून ओसंडून चाललेले कपाट. सगळीच आता अनिश्चितता. मधल्या काळात कित्येकदा लीना तिच्या घरी गेली. बाहेर उभे राहून वारंवार मनीषच्या विनवण्या केल्या. दार उघड मनीष. मला आत येऊ दे. मला तुझ्याशी बोलू दे...अगदी धाय मोकलून रडून झालं. परंतु ते दार म्हणजे जशी काय चीनची भिंतच उभी. असंख्य आक्रोश गिळंकृत करून अभेद्य उभी रहाणारी. मनीषच्या मित्रांचे मग फावले. त्यांच्या ओल्या पार्ट्या त्याच्या ह्या मोकळ्या घरात विनासायास झडू लागल्या. सकाळी ज्यावेळी कामवाली केर लादी करावयास येई त्यावेळी तिच्यासाठी दारुच्या इतस्तत: विखुरलेल्या बाटल्या उचलणे हे पहिले काम असे.

ताजी जखम अशीच उसकवत मनीषने आपल्या कॉलेजमधील जवळच्या मित्रांना एक दिवस गोळा केले. त्यांच्या रोजच्या हॉटेलमध्ये तो त्यांना घेऊन गेला. प्रत्येकाने आपापल्या आवडीची दारू मागवली. बिलाची चिंता नव्हतीच. नेहेमीच त्यांची बिले मनीषच भरत होता. दारू आली. ग्लास उंचावले गेले. मद्य हिंदोळले. मद्य चढले. व लीनाचे वस्त्रहरण केले गेले. लीनाने एक लफडे केलेय. आणि ते तिने नको तितके पुढे नेलेय. आणि म्हणून मी तिला घराबाहेर काढले आहे. कायमचे. मनीषने आपल्या सर्व मित्रांसमोर हे जाहीर केले. आज मुळी त्याला मित्रांना सगळे सांगायचेच होते. जखम उघडी करावयाचीच होती. मित्र हादरले. खरे तर लीनाला तेही ओळखत होतेच. तीही त्यांच्याच तर कॉलेजची होती. पण बायकांचे काय सांगता येते. तू दारू पितोस म्हणून काय तिने असे करायचे...वगैरे वगैरे...मनीषवर झालेला अन्याय सर्वांनी पटवून घेतला. त्यालाही तो अधिक पटवून दिला गेला. व हे जे तू तिला घराबाहेर काढले आहेस ते तू बरोबरच केले आहेस असा त्याच्या वागण्याला दुजोरा दिला गेला. हे घर तू तुझ्या कष्टाने घेतले आहेस. लीनाने आता असे केल्यावर तिला तिथून बाहेर काढणे हे बरोबरच आहे इत्यादी. शेखर मद्याचे घुटके घेत शांतपणे ऐकत होता.

मनीष पुरता कोसळला होता. आजवर लीना ही त्याने आयुष्यात गृहीत धरलेली गोष्ट होती. पूर्ण रंग भरत चित्र न्यावं आणि अकस्मात पाण्याचं भांड कलंडावं व सर्व रंग विस्कटून जावेत. कचेरीत उच्च पदांवर तो सरकत होता आणि लीनाने त्याला कड्यावरून खाली ढकलून दिलं होतं. तिला माफी नव्हती. त्या दिवशी तो कामासाठी कुठे निघाला होता. नेहेमीसारखी गाडी चालवत. संध्याकाळ नुकतीच झालेली होती. त्याचे जग अंधारलेले होते पण अजून बाहेर उजेडच होता. सिग्नलला तो गाडी वळवणार तेव्हढ्यात त्याला लीना दिसली. त्याच्या तळपायाची आग मस्तकात गेली. व त्याने अचानक गाडीचा वेग वाढवला. क्षणभराची खोटी व लीनाच्या अंगावर गाडी जावी. त्याची व लीनाची नजरानजर झाली. बावचळून लीना एकदम रस्त्याच्या कडेला सरकली. पडता पडता वाचली. गाडीच्या बोनेटचा तिने

आधार घेतला व स्वत:ला सावरले. पुन्हा वर बघितलं तर एका क्षणात पूर्ण तिरस्काराने तिला फाडून मनीष पुढे निघून गेला होता. तो तिरस्कार तिला कोसळवून गेला. एक अतिशय प्रखर वीज कोसळली होती तिच्या अंगावर. भडकत्या आगीचा जाळ तिला भेदून गेला होता. आणि कधी नव्हे इतक्या वेगाने मनीषने गाडी त्या गल्लीत घुसवली. त्याला जिथे काम होतं ती इमारत गेऊन गेली तरी मनीषने गाडी नाही थांबवली. कोणी ढकलून दिल्यासारखा तो निघाला. त्याच्या हातून मृत्यू लिहिलेला नव्हता म्हणून आज त्याच्या गाडीपुढे अजून कोणी नाही आलं.

कधीतरी एक मांजर आडवं गेलं होतं...व त्यानंतर अजून कोणीही आडवं गेलं नाही.

गौरी व लीना ह्यांचे कधीही सख्य नव्हते. एकमेकांना त्या ओळखत होत्या इतकेच. त्यामुळे ना ती कधी लीनाकडे धावून आली ना लीना कधी गौरीकडे गेली. मात्र मनीष, दारू व शेखर-गौरी ह्यांच्यावर आता अधिकाधिक अवलंबून राहू लागला.

इथे लीनाची नोकरी चालू होती. अनेकदा भावनिकदृष्ट्या कोसळून देखील तो नोकरीचा लढा मात्र तिने चालू ठेवला होता. तसेही तिला गत्यंतर नव्हते. पैसे कमावणे भाग होते. प्राजक्ता व तिचा स्वत:चा खर्च ती

तिच्या आई वडिलांवर कसा टाकू शकत होती ? त्यांनी तिला बिनतक्रार घरात घेतले हेच खूप झाले. इतक्या मोठ्या चुकीनंतर देखील त्यांनी त्यांच्या घराचे दरवाजे तिच्यासाठी उघडले ही मोठी गोष्ट नव्हती काय ? त्या दोघींच्या खर्चाचा भार मनीष काही आता सोसणार नव्हता. लीनाचे वडील ह्या सर्व घटनेने खचून गेले. त्यांनी एकदा परोपरीने मनीषची हात जोडून माफी मागितली. त्यांच्या कन्येच्या चुकीसाठी. बाप लाचार झाला. तिला माफ करा. ती तिच्या तोंडाने तिची चूक मान्य करतेय म्हणून तरी तिला माफ करा...बाप व्याकुळतेने सांगत होता. परंतु, मनीष व त्याच्या बरोबरीने आलेला शेखर तिथून तडकाफडकी निघून गेले. त्या पुण्यवान म्हाताऱ्याच्या विनवण्यांकडे पूर्ण दुर्लक्ष करून. आभाळ वाकलं होतं. मनीषने आपलं अंग चोरलं. तो दरवाजाकडे वळला त्यावेळी त्या बंद दरवाज्यापाशी हात जोडून लीना विनवण्या करत होती. आक्रोश चालू होता. शेखर व मनीष निघून गेले आणि लीना मटकन खाली बसली. तिला हे सर्व खरंच घडतंय ह्यावर विश्वास नव्हता बसत. आता आपल्याला वेड लागेल...आपण नाही ह्यातून जिवंत बाहेर पडू शकणार....नाही पडायचं ह्यातून जिवंत. गल्लीतील रोजच्या केमिस्टकडून लीनाने झोपेच्या गोळ्या जमवायला सुरुवात केली. दोन तीन दिवसांतून ती एकदा तिथे जाई व एकदोन गोळ्या मागून आणे. आज काय तर डॉक्टरांचा कागद घरीच राहिला तर उद्या म्हणे आहे पर्समध्ये..आत्ता सापडत नाहीये. केमिस्ट लहानपणापासून तिला ओळखणारा. त्याला काय

माहित लीना सरसोट कड्याच्या टोकाशी उभी आहे. आणि वर्तमानकाळ व भूतकाळ ह्यात असा कितीसा अवधी ? एक तर पळ. पापणी लवेस्तोवर तेव्हढाच तर वेळ जातो.

कचेरीतून मध्येच उठून लीना जवळच असलेल्या समुद्रापाशी जाऊन बसे. शून्यात नजर लावून. पर्समधून झोपेच्या गोळ्या काढे..आणि हातावर घेऊन मोजत बसे. पण तिला हे करवत नव्हतं..आपण अजून किती त्रास देणार आहोत आपल्या आई वडिलांना...आपण मरून गेलो तर मग काय करेल प्राजक्ता....मनीष थोडी सांभाळणार आहे तिला...अधिकाधिक दारू पीत राहील...आणि मग काय होईल प्राजक्ताचं. एक दिवस अशीच लीना वाळूत पाय अंगाशी घेऊन बसली होती. सूर्यास्त होत आला होता. आकाश ना लाल होतं. ना तांबूस. सगळं जसं करडं, रंगहीन. कातरवेळेची हल्ली लीनाला भीती वाटे. तिरमिरीत येऊन लीनाने सगळ्या गोळ्या समुद्रात फेकून दिल्या...एक गोळी हळूच तिच्या पावलाशी येऊन पडली...लीना वाकली. गोळी हातात घेतली. वाटलं, देव काय सांगतो आहे...काय तो तिची परीक्षा घेतो आहे...? हे असे आत्महत्या करणे म्हणजे का केलेल्या चुकीची शिक्षा ? की शिक्षेपासून पळ ? लीनाने वाकून तळहात पाण्यात धरला...हलकेच लाट गोळीवर फिरली. खारट पाणी हातात गोल फिरलं. बुडबुडे उठले. पाण्याने गोळीला फेरे धरले. लीनाने विरघळेस्तोवर तिला तळहातात धरून ठेवलं...ती हलकेच आक्रसत जाते ना जाते तोच पुढच्या लाटेने गोळीला खेचून नेलं. जशी त्या लाटेने लीनाला शिक्षा फर्मावली...जा...जगणे हीच तुझी शिक्षा...

- अनघा निगवेकर **(क्रमश:)**

http://restiscrime.blogspot.com/